सकाळ

# जुन्नरमधील महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबतची शपथ

**जुन्नर, ता. १६ :** जुन्नर येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सायबर सुरक्षेची सामूहिक शपथ घेण्यात आली.

आळे येथील बी. जे. महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांनी संयुक्तरित्या राबविलेल्या ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' प्रकल्पांतर्गत सायबर वॉरियर्स प्रतिक यादव, साक्षी नेहरकर, शोएब शेख यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व सांगितले. नवीन तंत्रज्ञान व सायबर सुरक्षेची सांगड घालत असताना कोणती काळजी घ्यावी याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही सायबर वॉरियर्सकडून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. सचिव मोहिनी जगताप हिने उपस्थितांना सायबर सुरक्षेची सामूहिक शपथ दिली. कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे, प्रा. मयुरी कुंभोजे, बी. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव, प्रकल्प समन्वयक प्रा. नुतन जोशी, प्राध्यापक सर्जेराव थोरात, दीपांजली कदम यांनी सहकार्य केले.



**जुन्नर :** सायबर सुरक्षेची सामूहिक शपथ घेताना विद्या व इतर उपस्थित.

Pune, District-Today
17/08/2025 Page No. 5